सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पश्चिम विभागिय रोगनिदान प्रयोगशाळा
रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-४११०६७
GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF ANIMAL HUSBANDRY
WESTERN REGIONAL DISEASE DIAGNOSTIC LABORATORY
DISEASE INVESTIGATION SECTION, AUNDH, PUNE - 411067

TELEPHONE :- 02025692135
FAX :- 02025691474
E-MAIL : dis.pune7@gmail.com
WEBSITE : www.ahd.maharashtra.gov.in

**जा. क्र.:- रोअवि / कुरोनिप्र / करोना- परिपत्रक / ६३५-३६ / २०२०, पुणे-६७, दि.११.०२.२०२०.**

## परिपत्रक

**विषयः-** ‘नोव्हेल करोना’ विषाणूंचा कुक्कूट पक्षी व उत्पादने यांचेशी संबध नसले बाबत...

महाराष्ट्र राज्य कुक्कूटपालन व्यवसायामध्ये देशात अग्रेसर आहे. सन २०१९ च्या २० व्या पशुगणनेनूसार राज्यामध्ये एकुण कुक्कुट संख्या ७ कोटी ४२ लाख इतकी आहे.

कुक्कट पक्ष्यांमध्ये होणारे विविध रोग व त्याचे नियंत्रण हा व्यवसायामधील यशस्वी होणेसाठीचा सर्वात महत्वाचा मुलमंत्र आहे. चीन या देशामध्ये आलेल्या ‘नोव्हेल करोना विषाणू’ प्रार्दुभावाच्या अनुषगांने गेल्या काही दिवसांपासून समाज माध्यमावर ( सोशल मेडीया - फेसबुक व व्हॉट्सअपद्वारे ) आपल्या देशात व राज्यात कुक्कूट मांस व इतर कुक्कूट उत्पादने यांच्या आहारातील उपयोगाबाबत विविध अशास्त्रीय अफवा पसरविल्या जात आहेत.

राज्यातील कुक्कुट पालन व्यवसायाशी लाखो शेतकरी यांचे चरितार्थ व हित निगडीत आहेत. मका व सोयाबीन उत्पादक शेतकरी विशेषतः कुक्कूट पालन उद्योगाशी संलग्न आहेत. तसेच कुक्कूट व्यवसाय राज्याच्या विकासाशी जोडलेला आहे.

कुक्कूट पक्षी व कुक्कूट उत्पादने यांचा ‘नोव्हेल करोना विषाणू’ प्रादुर्भावाशी कोणताही संबध नाही. कुक्कूट मांस व कुक्कूट उत्पादने मानविय आहारामध्ये वापरण्यासाठी पुर्णपणे सुरक्षीत असुन नागरीकांनी अश्या अफवांकडे दुर्लक्ष्य करावे व या बाबत कांही शंका असल्यास पशुसंवर्धन विभागाशी संपर्क करावा.

'नोव्हेल करोना विषाणू' हा सांसर्गिक असुन एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीस संक्रमीत होतो. तथापी कुक्कूट पक्षामधील करोना विषाणू (इन्फेक्शीअस ब्राँकायटीस) मानवामध्ये संक्रमीत होत नसल्याबाबत शास्त्रीय संदर्भ आहेत.

कुक्कूट मांस व कुक्कूट उत्पादने यांच्या सेवनामुळे मानवामध्ये 'नोव्हेल करोना विषाणू' संक्रमीत झाल्याचे संदर्भ नाहीत. आपल्याकडे चिकन व मटण उकळून शिजवून सेवन केले जाते व त्या तापमानात कुठलेही विषाणू जिवंत राहु शकत नाहीत.

तरी ग्राहकांनी सोशल मेडीया - फेसबुक व व्हॉट्सअप इत्यादी माध्यमातील विपर्यास केलेल्या माहिती / बातम्यां / अफवांवर विश्वास ठेवू नये. आपल्या कडील कुक्कूट मांस व कुक्कूट उत्पादने यांचा 'नोव्हेल करोना विषाणू' शी संबध नाही व ती आहारात वापरण्यासाठी पुर्णतः सुरक्षीत आहेत.

**सहआयुक्त पशुसंवर्धन,**
**रोग अन्वेषण विभाग,**
**औंध, पुणे-४११ ०६७.**

**प्रत - माहिती करीता सादर**

मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७.

**प्रत - माहिती व कार्यवाही करीता रवाना-**

१. महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन विभागातील सर्व संबंधित कार्यालये, अधिकारी आणि कर्मचारी.
२. सर्व संबंधित महाराष्ट्र राज्य कुक्कुट पालक व्यवसायिक.
३. महाराष्ट्र शासना माहिती व प्रसिध्दी विभाग.

सत्यमेव जयते

**सचिन्द्र प्रताप सिंह** भा.प्र.से.
आयुक्त

पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
स्पायसर कॉलेजच्या समोर,
औंध-खडकी रोड, औंध, पुणे - ४११०६७.
दुरध्वनी : 020 - 25690484
E-mail : cahpune@gmail.com (Off.)
Web. : ahd.maharashtra.gov.in

जा.क्र. कुक्कुट-२/नॉव्हेल करोना / १८८२-२०४२ / २०२०, प.सं.१३/पुणे-६७, दि./०३/२०२०
19 MAR 2020

विषय : "नॉव्हेल करोना" विषाणू प्रादुर्भाव व कुक्कुट उत्पादनांबाबत ....

प्रिय श्री देसाई,

"नॉव्हेल करोना" विषाणूचा प्रादुर्भाव भारतात व महाराष्ट्रात आढळून आलेला आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना शासन राबवित आहे.

दरम्यानच्या काळात समाजमाध्यमांमध्ये कुक्कुट पक्षांपासून मानवात "नॉव्हेल **करोना**" विषाणूचा प्रसार होत असलेबाबतची अशास्त्रीय माहिती पसरविली जात होती. समाजमाध्यमांमध्ये अशास्त्रीय व खोटी माहिती पसरविल्याबद्दल आवश्यक कायदेशीर कार्यवाही पशुसंवर्धन विभागामार्फत यापूर्वीच करण्यात आलेली आहे. मा.आयुक्त पशुसंवर्धन,भारत सरकार ,नवी दिल्ली यांनी कुक्कट पक्षांपासून "नॉव्हेल **करोना**" विषाणूचा प्रसार होत नसल्याबाबत स्पष्ट केलेले आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (Indian Council of Medical Research), नवी दिल्ली यांनी देखील अंडी व कुक्कुट मांस यामधून "नोव्हेल करोना" विषाणूचा प्रसार होत नसून त्यांचे सेवन पूर्णपणे सुरक्षित असल्याबाबत प्रसिद्धी पत्रक निर्गमित केलेले आहे.

कुक्कुट मांस व अंडी प्रथिनाचे उत्तम व स्वस्त स्त्रोत असून कुक्कुट उत्पादने मानवी आहारात वापरण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आहेत. कुक्कुट मांस व अंडी यांच्या सेवनामुळे "नोव्हेल करोना" विषाणूचा प्रसार होत नाही ही बाब आपल्या अधिनस्त सर्व विभाग, कार्यालये तसेच नागरिकांच्या निदर्शनास आणण्यासाठी व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.

आपला
( सचिन्द्र प्रताप सिंह )

प्रति ,

श्री दौलतराव देसाई
जिल्हाधिकारी , कोल्हापूर